जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 JUN 2017
तरुण भारत

# विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीत तंत्रज्ञान अधिविभाग प्रथम

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीमध्ये शहरी अभियांत्रिकी विद्यालये विभागात विद्यापीठातील डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीने (तंत्रज्ञान अधिविभाग) प्रथम क्रमांक पटकावला. इचलकरंजी येथे पार पडलेल्या कार्यक्रमात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व माजी खासदार कल्लाप्पाणा आवाडे यांच्या हस्ते तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ.जयदीप बागी यांना प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

विभागाला टीईक्यूआयपी-२ या प्रकल्पांतर्गत जागतिक बँकेमार्फत १०.५० कोटी रुपयांचे अनुदान प्राप्त झाले असून, टीईक्यूआयपी-३ प्रकल्पात समावेश करण्याची प्रक्रिया सुरु आहे. नॅक मानांकनातही विद्यापीठ अव्वल ठरले आहे. आयएसआयपी-९००१ त्याचबरोबर नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रीडीटेशन यांचे मानांकन मिळवण्यासाठी विभागाची जोरात तयारी सुरु आहे. या विभागाने उच्च दर्जाची परदेशी विद्यापीठे व संस्था, आय.आय.टी व नामवंत उद्योगाबरोबर करार केले आहेत. त्यामुळे या विभागात अत्यंत उत्कृष्ठ दर्जाचे संशोधन व शैक्षणिक सुविधा उपलब्ध आहेत.



कोल्हापूर : कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीमध्ये शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभाग प्रथम आल्याबद्दल पारितोषिक स्वीकारताना डॉ. जयदीप बागी. सोबत महेश काकडे, डॉ.सपना आवाडे आदी.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 JUN 2017
महाराष्ट्र टाईम्स



शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती २०१७ मध्ये शहरी अभियांत्रिकी विद्यालये विभागात प्रथम क्रमांकाचे बक्षीस कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते स्वीकारताना विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. जयदीप बागी. व्यासपीठावर कल्लाप्पाणा आवाडे, डी. बी. शिंदे आदी

# विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीमध्ये तंत्रज्ञान अधिविभाग प्रथम

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती २०१७ मध्ये शहरी अभियांत्रिकी विद्यालये विभागात डिपार्टमेंट ऑफ टेकनॉलॉजीने (तंत्रज्ञान अधिविभाग) प्रथम क्रमांक पटकावला. इचलकरंजी येथे पार पडलेल्या कार्यक्रमात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व माजी खासदार कल्लाप्पाणा आवाडे यांच्या हस्ते तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांना प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या प्रसंगी परीक्षा नियंत्रक महेश काकडे उपस्थित होते.

'संशोधन' हा गुणवत्तावाढीचा महत्त्वपूर्ण मार्ग असून विविध उपक्रमांची विद्यार्थ्यांनी ओळख करून देण्याची गरज असल्याचे प्रतिपादन कुलगुरू डॉ. शिंदे यांनी याप्रसंगी केले. तंत्रज्ञान अधिविभागाणे अल्पावधीतच शिष्यवृत्तीमध्ये प्रथम क्रमांक पटकावला असून गुणवत्तापूर्ण शिक्षणानेच हे पारितोषिक प्राप्त झाले, असे प्रतिपादन संचालक डॉ. जयदीप बागी यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 JUN 2017

महाराष्ट्र टाईम्स

# हिमनगाचे टोक

तुम्ही सोशल मीडियाचा नियमित उपयोग करणारे असाल तर तुम्ही एक



तर सहानुभूतीचा किंवा दुसरा म्हणजे चिंतेचा विषय होऊ शकता. कारण सर्वजण हे माध्यम एकत्रिकरणाचे, मीडिया कन्व्हर्जनचे असल्याने सरकार, व्यक्ती, संस्था आणि माध्यमे ही विशेषत: संकेतस्थळे ट्विटर, फेसबुकवर उपलब्ध असल्याने आपल्याला ई-गव्हर्नल आणि एम-गव्हर्नल, मोबाइल प्रशासन याचा वापर करणे एक नागरिक म्हणून आवश्यक झाले आहे. संगणकविरहित कार्यांची आता कल्पना करणे शक्य नाही. कोणत्याही माध्यमाच्या चांगली आणि वाईट अशा दोन बाजू असतात. त्यामुळे शाळेतील '...शाप की वरदान' या निबंधासारखाच विचार इथेही असतो.

समाजमाध्यमांचा उपयोग जसा वाढत चालला आहे, तसा रोजच या माध्यमांचा उपयोग करून एकमेकांची बदनामी करणे, टिंगल करणे, पाठपुरावा करणे, विरोधी मते तयार करणे, अपमानजनक पोस्ट टाकणे असे प्रकार पुढे येत आहेत. अशा प्रकारांना ऑनलाइन टोलिंग हा शब्दप्रयोग वापरला जातो. कोणीतरी सेलिब्रिटी आपले ट्विटर अकाउंट बंद करतो, तर कोणी माझ्या नावे खोटी पोस्ट व्हायरल झाल्याची तक्रार करताना दिसत आहेत. विषेशत: नुकत्याच शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी झालेल्या आंदोलनाच्या विरुद्ध व्यक्त झालेली मते खरोखरच संबधित व्यक्तींची होती काय ? असा प्रश्न आता पुढे येत आहे. प्रणव रॉय यांच्या एनडी टीव्हीच्या सीबीआयच्या छाप्यानंतर 'हिंदू' या इंग्रजी वृत्तपत्राच्या मालिनी पार्थसारथी यांच्या मते, प्रणव रॉय यांनी, त्यांच्या कॉमेंटनंतर त्यांना ट्विटरवर ब्लॉक केले आहे. फेसबुकवर देखील आपल्याला 'अनफॅलो' करण्याची सोय आहे. राजकीय पक्षांच्या नेत्यांची व्यंगचित्रे, विधाने, आकडेवारी, यश-अपयश अशा दोन्ही बाजूंनी म्हणजेच खंडण-मंडण करणारी मंडळी या व्यवसायात स्वतंत्रपणे आहेत, हे उघड सत्य आहे. यापेक्षाही वाईट म्हणजे तुम्ही कोणत्या बाजूने मत व्यक्त करता याकडे बारकाईने लक्ष ठेवणारी यंत्रणा असावी, ही धास्ती अनेकांच्या मनात आहे. बोलावे की बोलू नये, अशा परिस्थितीत नवमाध्यमे वापरणारी मंडळी संभ्रमावस्थेत असणे स्वाभाविक आहे. याचे कारण म्हणजे चेहरा नसलेला म्हणजे ज्यांना आपण ओळखत नाही अशा अमर्यादित, अगणित व्यक्तीपर्यंत या डिजिटल स्पेसच्या माध्यमातून पोहचू शकतो. या माध्यमांचा दुरुपयोग करणाऱ्यांची संख्या वाढत आहे. विशेषत: अश्लील क्लीप टाकणे, दिशाभूल करणे, अफवा पसरवणे एवढेच नव्हे तर आत्महत्या करत असताना किंवा करत आहे अशा आशयाच्या सूचना टाकणे किंवा पोस्टला लाईक मिळाले नाही म्हणून आत्महत्या करणारे आहेत. इंग्लंडच्या 'गार्डियन' वृत्तपत्राने फेसबुकवर काय टाकावे आणि काय नको, यावर मार्गदर्शक तत्त्वे तयार केलेली आहेत. हिंसक, द्वेष पसरवणारी, दहशतवादी, अश्लील, वांशिक स्वत:ला इजा पोहोचविणारी असे विषय टाळावेत यासाठी प्रषिक्षण देण्यासाठी अंतर्गत मोड्युल तयार केलेली आहेत. याचाच अर्थ पारंपरिक माध्यमांप्रमाणे या नवमाध्यमांनीही स्वत:च्या आचारसंहितेची आवश्यकता आहे. भारतात आयटी ॲक्ट आहे. फेसबुक आणि ट्विटर ही दोन समाजमाध्यमे अधिक प्रचलित असल्याने यावर व्यक्त होणारे विचार कशी मर्यादा घालता येईल यावर जगभर विचारमंथन होत आहे. आपल्याकडे राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचे निवृत्तीचे वय ५८ वरून ६० वर्षे करण्यात आल्याचे शासकीय परिपत्रक सर्वत्र फिरत होते. शेवटी याबाबत राज्यसरकारला ते परिपत्रक खोटे असल्याचे व असा निर्णय झाला नसल्याचा खुलासा करावा लागला होता. मे २०१६ ला युरोपियन कमिशनला चोवीस तासांच्या आत द्वेष पसरवणारी माहिती, व्हिडिओ काढून टाकण्याची हमी फेसबुक, व्टिटर, गुगल आणि मायक्रोसॉफ्ट कंपनीला द्यावी लागलेली आहे.

आपल्याकडे ऑनलाइन माध्यमांसाठी किंवा ऑनलाइन मुक्त पत्रकार, इतर मुक्त पत्रकार यांना संरक्षण देण्याचा विचार करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र पत्रकार संरक्षण कायदा २०१७ मध्येही याविषयीची तरतूद असणे आवश्यक होते. जेथे पत्रकारांना ट्रोल करून अश्लील भाषेत शिवी दिली जाते, महिला पत्रकारांना बलात्काराच्या धमक्या दिल्या जातात किंवा निर्भयासारखे हाल करू, असे सांगितले जाते. तेथे सर्वसामान्य नागरिक ऑनलाइन हिंसेचे बळी पडणार नाही, याविषयी हमी देता येत नाही. ऑनलाइन हिंसा हे वरवरचे हिमनगाचे टोक असून, यापेक्षाही मतभेद, मनभेद, विखारी, एकांगी प्रचारासाठी समाजमाध्यम जाणीवपूर्वक वापरले जात आहे. याविषयी सामाजिक जाणीव जागृतीची आवश्यकता आहे.

● डॉ. निशा मुडे-पवार
nishapawar1968@rediffmail.com

28 JUN 2017 **Times of India** जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Forest dept's green drive receives good response

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The forest department has received a good response in the district for the tree plantation drive at the centres which are selling saplings at a nominal rate.

The forest department has identified 13 spots where saplings will be sold for purchase till June 30. By then, the department aims to sell around 1.5 lakh saplings.

Prabhu Nath Shukla, deputy conservator of forest, Kolhapur said, "We are selling saplings at your doorstep and at 13 sapling distribution centres across the district. Each centre is given a target of selling 10,000 saplings each at a nominal rate of Rs 8. We have received a good response since we opened the centres on June 25. Those interested in buying saplings can visit these centres and purchase the saplings as per their choice and availability."

The saplings are sold between 10am and 7pm and the saplings will be planted during 'Van Mahotsav' from July 1 to 7 in the district. "We aim to plant four crore saplings in the state in that one week," said Shukla.

Rahul Gaikwad



**The forest department has a bus with all the details about the scheme touring across the state, which entered Kolhapur on Tuesday**

Four centres have been set up in Kolhapur city — at Bindu chowk, Shivaji University, Rankala Lake and near Pitali Ganapati chowk at Tarabai park. "We have not gathered information about how many saplings have been sold from these centres so far but will collect the data on June 30," added Shukla.

The forest department aims to plant 8.19 lakh saplings in the Kolhapur district, of which they will plant 4 lakh. Meanwhile, the target for gram panchayats is 1.77 lakh saplings. Every individual will get five saplings and organisations will get 25 saplings.

To spread awareness about the plantation drive, the forest department has a bus with all the details about the scheme touring across the state. The bus entered Kolhapur on Tuesday and toured across various chowks in the city and then headed towards Sindhudurg.